Rayat Shikshan Sanstha's
Mahatma Phule Mahavidyalaya, Pimpri, Pune-17
DEPARTMENT OF HISTORY

# 'शिवस्वराज्य दिन' अहवाल

छत्रपती शिवाजी महाराजांचा ६ जून १६७४ या दिवशी रायगडावर राज्याभिषेक झाला होता. हा दिवस स्वराज्याची सार्वभौमत्वाची, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. हा दिवस शासनाने सर्व शासकीय कार्यालयात **'शिवस्वराज्य दिन'** म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार महात्मा फुले महाविद्यालयातिल राष्ट्रीय सेवा योजना विभाग व इतिहास विभाग यांच्या सयुक्त विद्यमाने **'शिवस्वराज्य दिन'** साजरा करण्यात आला प्रथमता महाविद्यालयात प्राचार्य प्रोफेसर माधव सरोदे साहेब यांच्या हस्ते छत्रपति शिवाजी महाराजाच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. त्यासोबत राष्ट्रगित गाण्यात आले. दुपारी १२.१५ वाजता शिवव्याख्याते मा.श्री रविंद्र भाऊसाहेब जगदाळे यांचे **"शिवरायांची युद्धनीती व शस्त्रसज्जता"** या विषयांवर व्याख्यान आयोजित करण्यात आले.. छत्रपती शिवाजी महाराजांची स्वरक्षण सिद्धता त्यांनी युद्धनितीत वापरलेली शस्त्रे प्रतिकृत परिस्थितीत असलेल्या वस्तुचा शस्त्र म्हणून त्यांनी केलेला उपयोग हा सर्व गोष्टीचा सविस्तर उल्लेख त्यांनी आपल्या व्याख्यानात केला. त्यांनी वापरलेली शस्त्रे ही अत्यंत प्राविण्य पूर्ण पणे वापरण्याची कला मराठी सैन्यात होती. भाले, तलवारी, धनुष्यबाण, व इतर साहीत्य त्यांनी अत्यंत लिलया पद्धतीने वापरण्याचे काम त्यांनी केले. अठरापागड जातीना सोबत घेऊन स्वराज्यांची निर्मितीचे कार्य छत्रपती शिवाजी महाराजानी केले. असा उल्लेख त्यांनी केला,

आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य साहेबांनी सभोवतालच्या प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढत छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. जनतेच्या कल्याणाचे कार्य

केले. महाराष्ट्रातील जनतेला भयमुक्त केले. व ६जुन १६७४ मध्ये खऱ्या अर्थाने राज्यभिषेक करून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोहली. महाराष्ट्राच्या इतिहासाला वैभवशाली सुरवात झाली. असे त्यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य शाहजी मोरे सर यांनी केले. पाहुण्याचा परिचय इतिहास विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. संदीप नन्नावारे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. संग्राम गोसावी तर आभार डॉ. मिलिंद भादरे यांनी मानले कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




प्राचार्य, प्रोफेसर माधव सरोदे साहेब यांच्या हस्ते छत्रपति शिवाजी महाराजाच्या प्रतिमेचे पुजन







शिवव्याख्याते मा.श्री रविंद्र भाऊसाहेब जगदाळे यांचे "शिवरायांची युद्धनीती व शस्त्रसज्जता" या विषयांवर व्याख्यान




